Industrial Training Institute

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

# भानुदास मणिराम सावे शिक्षण संस्था

रजिस्ट्रेशन क्रमांक : महा/1485/85 ठाणे दि.24.10.1985 / न्यास नोंदणी क्र.F-1309 ठाणे/F-80 पालघर

संचालित,

# ल.ज.राऊत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था

चिंचणी, तालुका : डहाणू, जिल्हा : पालघर, पिन कोड: 401 503, महाराष्ट्र

E-mail : bhanudassave120@gmail.com WebSite : bmsssitichinchani.com

संपर्क क्रमांक : 7498487689








# माहिती पुस्तिका

| कार्यकारी मंडळ | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदाधिकारी / सदस्यांची नावे** | **पद** |
| १. | श्री.अनिल भास्कर सावे | अध्यक्ष |
| २. | श्री.रजनीकांत भाई पुरुषोत्तम श्रॉफ | उपाध्यक्ष |
| ३. | श्री.काशिनाथ भाई पाटील | उपाध्यक्ष |
| ४. | श्री. नितीन अनंत सावे | खजिनदार |
| ५. | श्री. विजय नारायण म्हात्रे | सचिव |
| ६. | श्री. विजय मणिराम सावे | सचिव |
| ७. | श्री. सुधीर भानुदास सावे | सदस्य |
| ८. | श्री.किरण सखाराम चुरी | सदस्य |
| ९. | श्री. समीर शरद राऊत | सदस्य |
| १०. | श्री.सुहास परशुराम राऊत | सदस्य |
| ११. | श्रीमती. मंजुषा महेश चुरी | महिला सदस्य |
| १२. | श्री.मोहन रामचंद्र राऊत | स्वीकृत सदस्य |
| १३. | सौ. रोहिणी रविंद्र सावे | स्वीकृत सदस्य |
| १४. | सौ.आशा संजय वर्तक | स्वीकृत सदस्य |
| १५. | श्री.प्रसाद सुरेश चुरी | स्वीकृत सदस्य |
| १६. | श्री.कमलेश सुरेंद्र वर्तक | स्वीकृत सदस्य |




# वंदनीय भानुदास मणिराम सावे

“भानुदास मणिराम सावे शिक्षण संस्था संचालित, ल.ज.राऊत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (I.T.I.)” आपल्या चिंचणी आणि पंचक्रोशीतील तरुणांना तंत्र-शिक्षण देण्याचे कार्य सन 1990 पासून अविरत पणे करीत आहे.

वंदनीय भानुदास सावे सर, एक प्रसिद्ध शिक्षण तज्ञ असून त्यांना गारगोटी, जिल्हा- कोल्हापूर येथे शैक्षणिक क्षेत्रात करिअरची सुरुवात करण्याची संधी मिळाली. थोर शिक्षण तज्ञ श्री. जे.पी. नाईक यांनी 1951 मध्ये शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण लोकांच्या उन्नतीसाठी मौनी विद्यापीठाची स्थापना केली. वंदनीय भानुदास सावे सरांनी मौनी विद्यापीठात संचालक पदावर कार्यरत असताना उत्कृष्ट काम केले.

आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवाच्या आधारे चिंचणी आणि पंचक्रोशीतील तरुणांना सुशिक्षित आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी त्यांनी मौनी विद्यापीठातील उच्च पदावरील नोकरीचा त्याग केला व चिंचणीच्या के.डी.हायस्कूल येथे मुख्याध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना राज्य शासना तर्फे “आदर्श शिक्षक” पुरस्काराने सन्मानित करण्यांत आले.

वंदनीय भानुदास सावे सरांना दि. 02 फेब्रुवारी 1984 रोजी देवाज्ञा झाली. त्यानंतर सावे सरांच्या स्मरणार्थ ग्रामस्थांनी आपल्या पंचक्रोशीतील तरुणांना औद्योगिक क्षेत्रातील नोकरीच्या व स्वयंरोजगाराच्या संधी लक्षात घेऊन तंत्र शिक्षण देण्याच्या हेतूने “ भानुदास मणिराम सावे शिक्षण संस्था” स्थापन केली. व त्याद्वारे “लक्ष्मण ज. राऊत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिंचणी येथे सुरु केली.



# आदरणीय कै श्री. लक्ष्मण ज. राऊत.

चिंचणीला अनेक स्वातंत्र्यसैनिक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक, लेखक, खेळाडू आणि शेतकरी यांचा इतिहास आहे. श्री. लक्ष्मण ज. राऊत सर हे स्वातंत्र्यानंतर चिंचणी परिसराच्या शैक्षणिक प्रगतीत योगदान देणाऱ्या व्यक्तींपैकी एक होते. श्री. लक्ष्मण राऊत सरांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर, त्यांनी त्यांच्या आईच्या प्रेमळ आणि शिस्तबद्ध वातावरणात शिक्षण पूर्ण केले आणि ते शिक्षण क्षेत्रात दाखल झाले. पुढे राऊत सर ग्रामपंचायत चिंचणीचे सदस्य झाले, त्यावेळी त्यांनी गावात वाचनालय व्हावे यासाठी प्रयत्न केले. चिंचणी शेतकरी संस्थेतही त्यांचा सहभाग होता. त्यांनी नेहमीच गावाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. संस्थेच्या स्थापने साठी उभारणीमध्ये राऊत सरांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबीयांनी मोलाचे आर्थिक सहकार्य व मार्गदर्शन केले आहे.

Industrial Training Institute

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

# औद्योगिक प्रशिक्षण संस्था

राज्यातील एकूण 417 शासकीय व 538 खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून एकूण 79 प्रकारच्या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते.त्यात अभियांत्रिकी एक वर्ष कालावधीचे एकूण 23 व्यवसाय अभ्यासक्रम,दोन वर्ष कालावधीचे एकूण 32 व्यवसाय अभ्यासक्रम,तसेच बिगर अभियांत्रिकी गटातील एक वर्ष कालावधीचे 24 व्यवसाय अभ्यासक्रमाचा समावेश केला आहे.

त्यापैकी आपल्या संस्थेतून अभियांत्रिकी गटातील वीजतंत्री, तारतंत्री, जोडारी हे दोन वर्षाच्या कालावधीचे तर संधाता हा एक वर्षाच्या कालावधीच्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे तर बिगर अभियांत्रिकी गटातील कंप्युटर ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग असिस्टंट ह्या एक वर्षाच्या कालावधीच्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण दिले जाते. अभ्यासक्रम यशस्वी रित्या पूर्ण करून परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारास प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांच्या कडून राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे (NCVT) राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र ( National Trade Certificate- NTC) दिले जाते.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये प्रात्यक्षिक (Practical) भाग 70% व सैद्धांतिक (Theory) भाग 30% आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यावर रोजगार व स्वयंरोजगाराबरोबरच उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना पदविका अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या वर्गात थेट प्रवेश दिला जातो.

औद्योगिक प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात प्रचंड मागणी आहे. भारतामध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये झपाट्याने औद्योगिकीकरण होत असताना औद्योगिक क्षेत्राला कुशल कामगारांची खूप मोठ्या प्रमाणात मागणी आहे व हि मागणी काही प्रमाणात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या मार्फत पूर्ण केली जात आहे. आपल्या देशातील तरुणाला तांत्रिक प्रशिक्षणा बरोबरच मूल्य वर्धित शिक्षण देण्याचे कार्य हि संस्था मागील 35 वर्षांपासून अविरत करीत आहे.

संस्थे मध्ये नियमित प्रशिक्षणा बरोबरच मुलांच्या अंगीभूत कौशल्याना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने दरवर्षी क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, लांब उडी, थाळी फेक, भाला फेक, गोळा फेक, १०० मी. धावणे, ४०० मी. रिले, बुद्धिबळ, वत्कृत्व, हस्ताक्षर, प्रश्नमंजुषा स्पर्धा अशा वेगवेगळया स्पर्धाचे आयोजन केले जाते. तसेच प्रशिक्षण कालावधीमध्ये आदर्श प्रशिक्षणार्थी, आदर्श स्वयंसेवक, सर्वोत्कृष्ट खेळाडू तसेच १०० % उपस्थिती देणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना सन्मानित केले जाते. याच बरोबर आपल्या संस्थेतील प्रशिक्षणार्थ्या मध्ये तांत्रिक कौशल्या बरोबरच

व्यक्तिमत्व विकास, व सामाजिक जबाबदारी चे भान व ते जपण्यासाठी आवश्यक मुलभूत कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यासाठी विज्ञान दिन, पर्यावरण दिन या सारखे अनेक दिनविशेष साजरे केले जातात.

एम.के ज्युनिअर कॉलेज चिंचणी आणि भानुदास मणिराम सावे शिक्षण संस्था चिंचणी ह्यांच्या संयुक्त विद्यमाने इ. ११ वी आणि इ. १२ वी मध्ये सायन्स ह्या शाखेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना इंजिनीअरिंग मध्ये करिअर करावयाचे आहे त्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या योजनेतून मेकेनिकल व इलेक्ट्रिकल मेंटेनन्स हे दोन स्वतंत्र विषय शिकविले जातात. त्यामुळे या विषयातून १२ वी उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थी डिप्लोमा इंजिनीअरिंग च्या थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेऊन पुढील शिक्षण पूर्ण करू शकतात. ह्या अभ्यासक्रमामुळे इंजिनीअरिंग पदवी प्रशिक्षणात खूप लाभ होतो.

ह्या संस्थेतून हजारो प्रशिक्षाणार्थ्यानी औद्योगिक प्रशिक्षण घेतले असून त्यापैकी संस्थेचे अनेक माजी प्रशिक्षणार्थी देश-विदेशात शासकीय तसेच खाजगी नामांकित कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदावर कार्यरत आहेत तसेच उत्तम यशस्वी उद्योजक म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये ह्या संस्थेचा विशेष नावलौकिक आहे.

आपणही असेच आपल्या जीवनात यशस्वी व्हावे व त्या माध्यमातून संस्थेचे नाव लौकिक वाढवावे. अशी संस्थेचे कर्मचारी, निदेशक, प्राचार्य, पदाधिकारी, सदस्य, सभासद, देणगीदार, हितचिंतक ह्यांची अपेक्षा आहे.

Industrial Training Institute

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

# प्रवेश प्रक्रिया ऑगस्ट -2023

| अनु.क्र | व्यवसाय | पात्रता | प्रवेशसाठी उपलब्ध जागा |
|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिशिअन | 10 वी पास | 32 + 8 |
| 2 | फिटर | 10 वी पास | 16 + 4 |
| 3 | वायरमन | 10 वी पास / नापास | 16 + 4 |
| 4 | वेल्डर | 10 वी पास / नापास | 32 + 8 |
| 5 | कोपा (कॉम्पुटर ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग असिस्टन्स) | 10 वी पास | 20 +4 |
| 6 | द्विलक्षी अभ्यासक्रम : मेकेनिकल मेंटेनन्स | 10 वी उत्तीर्ण | 32 |
| 7 | द्विलक्षी अभ्यासक्रम : इलेक्ट्रीकल मेंटेनन्स | 10 वी उत्तीर्ण | 32 |

संस्थेतील प्रवेश प्रक्रिया हि महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralised Admission Process - CAP) केली जाते.

https://admission.dvet.gov.in/

प्रवेश प्रक्रियेकरिता संस्थेतून अचूक पद्धतीने अर्ज भरून दिले जातात तसेच निश्चित प्रवेशासाठी अचूक मार्गदर्शन केले जाते तरी या संधीचा फायदा घेऊन आपले भविष्य उज्वल करावे.

Industrial Training Institute

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

# प्रवेश प्रक्रिया

राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रवेश प्रक्रिया ऑगस्ट २०१५ पासून ऑनलाईन पद्धतीने एकत्रित रित्या करण्यांत येत आहे.

### १२. प्रवेश प्रक्रियेतील टप्पे




**माहितीपुस्तिका:**


१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तसेच प्रवेश संकेत स्थळावर "आय.टी.आय. प्रवेश माहितीपुस्तिका - प्रवेश पध्दती, नियमावली व प्रवेश प्रक्रीयेतील विविध स्तरावर करावयाच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती" उपलब्ध करुन देण्यात येत आहे. माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली माहिती, नियम व प्रवेश पध्दतीचा अभ्यास करुनच ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करावा.



**प्रवेश अर्ज:**

२. ऑनलाईन प्रवेश अर्जासाठी https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. प्रवेश अर्जात प्राथमिक माहिती भरल्यानंतर उमेदवारांचे प्रवेश खाते (Admission Account) त्यांचा नोंदणी क्रमांक (Registration Number) हाच User ID म्हणून तयार होईल. नोंदणी क्रमांक व User ID चा वापर करुन उमेदवारांनी त्यांच्या कडील दस्तऐवजाच्या आधारे प्रवेश अर्जात संपूर्ण माहिती काळजीपूर्वक भरावी. प्रवेश अर्ज पूर्ण भरल्यावर सर्व माहिती बरोबर असल्याची पुनच्छ: खात्री करुन घ्यावी. प्रवेश अर्जातील माहिती बरोबर असल्याची खात्री झाल्यावरच प्रवेश अर्ज शुल्क ऑनलाईन स्वरुपात जमा करावे.

**प्रवेश अर्ज पडताळणी (Verification) व निश्चित (Confirmation) करणे**




३. प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी उमेदवाराने प्रवेश अर्जातील माहिती/ दाव्यांच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक मुळ दस्तऐवज/ कागदपत्रे नजिकच्या औ.प्र. संस्थेत पडताळणीसाठी सादर करावेत. औ.प्र. संस्थेतील अधिकारी मुळ अर्जातील माहितीची सादर केलेल्या मुळ दस्तऐवजावरुन काळजीपूर्वक तपासणी करतील व अर्जाचे निश्चितीकरण करुन "अर्ज निश्चितीकरण पावती" (Application Confirmation Slip) व निश्चित केलेल्या प्रवेश अर्जाची (Confirmed Application Form) प्रत देतील. प्रवेश अर्ज निश्चित झाल्यावर अर्जातील कोणत्याच माहितीत बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**पहिल्या प्रवेश फेरीसाठी विकल्प सादर करणे:**



४. प्रवेश अर्ज निश्चित केल्यावरच पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्यासाठी प्रवेश संकेतस्थळावर नोंदणी क्रमांक (Registration No.) व पासवर्ड (Password) व्दारे प्रवेश (Login) करुन सादर करावेत.

**प्राथमिक गुणवत्ता यादी तपासणे व हरकती नोंदविणे:**

५. प्राथमिक गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व उमेदवारांना SMS व्दारे कळविण्यात येईल.

६. उमेदवारास प्रवेश अर्जातील काही निवडक माहितीत बदल करण्याची संधी "हरकती नोंदविणे" या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरीता उमेदवाराने प्रवेश संकेतस्थळावर आपल्या खात्यात प्रवेश (Login) करुन प्रवेश अर्जातील माहितीत आवश्यक बदल करावेत. सदर कालावधीनंतर प्रवेश अर्जात कोणताच बदल करता येणार नाही.

**प्रवेश फेरीत निवड व प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही:**




७. प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व उमेदवारांना SMS व्दारे कळविण्यात येईल

८. उमेदवारांना निवड झालेल्या संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश निश्चित करण्यासाठी प्रवेश अर्जात सादर केलेल्या माहितीच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक दस्तऐवज सादर करणे अनिवार्य राहिल. प्रवेश अर्जातील माहिती व त्या पुष्ठ्यर्थ सादर केलेल्या दस्तऐवजांतील माहितीत तफावत आढळल्यास प्रवेश नाकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**पुढील प्रवेश फेरीसाठी विकल्प सादर करणे:**



९. निवड न झालेल्या वा प्रवेश न घेतलेल्या उमेदवारांनी पुढील प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करावेत. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जुनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यात येतील. दुसरी, तिसरी व चौथी प्रवेश फेरी बाबत पुढील कार्यवाही वरील मुद्दा क्र. ७ ते ८ प्रमाणेच राहिल.

**नव्याने अर्ज करणे:**

१०. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण/अनुत्तीर्ण व अद्याप पर्यंत कोठेही प्रवेश न घेतलेल्या तसेच औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी अर्ज न केलेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा/ संस्थास्तरीय समुपदेशन फेरीपूर्वी नव्याने अर्ज करण्याची, प्रवेश अर्ज शुल्क भरण्याची व प्रवेश अर्ज निश्चित करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल.


**शासकीय व खाजगी औ.प्र. जिल्हास्तरीय/ संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी नाव नोंदणी:**



११. नोंदणीकृत उमेदवारांनी औ.प्र. संस्थानिहाय व व्यवसाय निहाय रिक्त जागांचा अभ्यासकरुन जिल्हा/ संस्थास्तरीय समुपदेशन प्रवेश फेरीसाठी आपल्या प्रवेश खात्यात प्रवेश (Login) करुन कोणत्याही एका जिल्हा/ संस्थेच्या समुपदेशन फेरीकरिता दिलेल्या वेळापत्रकानुसार नोंदणी करावी.

१२. संगणक प्रणालीव्दारे जिल्हा/ संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी जिल्हा/ संस्थानिहाय गुणवत्ता यादी प्रकाशित करण्यात येईल, समुपदेशन फेरीसाठी वेळ व दिनांक बहाल करण्यात येईल व याबाबत उमेदवारास त्यांच्या प्रवेश खात्यात व SMS व्दारे माहिती देण्यात येईल.


**समुपदेशन फेरी:**



१३. दिलेल्या वेळ व दिनांकास हजर असलेल्या उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल व प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करणे.

१४. सदर प्रवेशफेरीत जागा बहाल करण्यात आलेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित औ.प्र.संस्थेत दिलेल्या मुदतीत प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करावी.

**संस्था स्तरावरील प्रवेश:**




१५. खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा व पावव्या प्रवेश फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर ज्या उमेदवारांची प्रवेश घेण्याची इच्छा आहे त्यांनाही त्यांची तपशिलवार माहितीसह प्रवेश संकेतस्थळावर नोंदणी करावी लागेल.

१६. नोंदणीकृत उमेदवारांनी ज्या खाजगी औ.प्र. संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेत व्यक्तीश: हजर राहून सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी. केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या फेरीपासून ते प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर उमेदवारांना प्रवेश घेता येतील.

## • संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्यात येणाऱ्या व्यवसायांविषयी थोडक्यात माहिती

### ✓ इलेक्ट्रिशिअन (वीजतंत्री) :

आय.टी.आय मधील या व्यवसायामध्ये विज आणि विजेची उपकरणे ह्यांच्या विषयी सखोल माहिती शिकायला मिळते. औद्योगिक क्षेत्रातील तसेच आपल्या नियमित आयुष्यातील बहुतेक क्रिया ह्या विजेच्या उपकरणाच्या सहाय्याने केल्या जातात. ह्या व्यवसायाच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये वायरिंग व वायरिंग चे विविध प्रकार, वीज निर्मिती प्रक्रिया, ए.सी. आणि डी.सी. प्रवाह, अर्थिंग आणि विविध विद्युत उपकरणांविषयी तसेच घरातील वायरिंग, सर्व प्रकारच्या घरगुती व इंडस्ट्रियल मोटर्स त्यांची देखभाल व दुरुस्ती, घरगुती वायरिंग ची डिझाईन, इंडियन इलेक्ट्रिसिटी रूल्स तसेच इंडस्ट्री मध्ये होणाऱ्या सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिकल कामांविषयी माहिती दिली जाते प्रात्यक्षिक व सैद्धांतिक माहिती शिकविली जाते. ह्या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण दोन वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर एक वर्षाची शिकाऊ उमेदवारी (Aprenticeship) कारखान्यातून पूर्ण करावी लागते त्यानंतर वेगवेगळ्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कारखान्यामध्ये नोकरी च्या संधी उपलब्ध आहेत. तसेच डिप्लोमा इंजीनिअरिंग मध्ये पुढील शिक्षणासाठी थेट द्वितीय वर्षामध्ये प्रवेश मिळतो व पदवी अभ्यासक्रम सहज पूर्ण करता येतो.

### ✓ वायरमन ( तारतंत्री ) :

ज्या मुलांना आय.टी.आय मधील इलेक्ट्रिकल व्यवसायामध्ये प्रशिक्षण घ्यायचे असते परंतु 10 वी मध्ये कमी गुण मिळाल्यामुळे इलेक्ट्रिशिअन या व्यवसाया मध्ये प्रवेश मिळू शकत नाही अशी मुले वायरमन ह्या विषयांत प्रवेश घेऊ शकतात. साधारणपणे इलेक्ट्रिशिअन व वायरमन ह्या व्यवसायाचे अभ्यासक्रमाची तुलना केली असता दोन्ही व्यवसायाचे अभ्यासक्रम जवळ जवळ ९० % समान आहे. ह्या व्यवसायामध्ये आपल्याला विज आणि विजेची उपकरणे ह्यांच्या विषयी सखोल माहिती शिकायला मिळते. औद्योगिक क्षेत्रातील तसेच आपल्या नियमित आयुष्यातील बहुतेक क्रिया ह्या विजेच्या उपकरणाच्या सहाय्याने केल्या जातात. ह्या व्यवसायाच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये वायरिंग व वायरिंग चे विविध प्रकार, वीज निर्मिती प्रक्रिया, ए.सी. आणि डी.सी. प्रवाह, अर्थिंग आणि विविध विद्युत उपकरणांविषयी तसेच घरातील वायरिंग, सर्व प्रकारच्या घरगुती व इंडस्ट्रियल मोटर्स त्यांची देखभाल व दुरुस्ती, घरगुती वायरिंग ची डिझाईन, भारतीय इलेक्ट्रि सिटी नियम तसेच इंडस्ट्री मध्ये होणाऱ्या सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिकल कामांविषयी प्रशिक्षण दिले जाते. ह्या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांना दोन वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर एक वर्षाची शिकाऊ उमेदवारी (Aprenticeship) कारखान्यातून पूर्ण करावी लागते त्यानंतर वेगवेगळ्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कारखान्यामध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

### ✓ फिटर (जोडारी) :

ह्या व्यवसायात प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात प्रचंड मागणी आहे. हा व्यवसाय दोन वर्ष कालावधीचा असुन ह्या व्यवसायामध्ये आपल्याला विविध मशिनिंग ऑपरेशन, मार्किंग, मेजरिंग, कटिंग, प्रिसिजन रीडिंग, लेथ मशीन, शीट मेटल वर्क, वेल्डिंग वर्क, हायड्रोलिक आणि प्न्यूमाटिक सिस्टीम, मेटल्स, मेंटेनन्स अशा विविध प्रक्रियेविषयी प्रशिक्षण मिळते. ह्या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांना

प्रशिक्षण दोन वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर एक वर्षाची शिकाऊ उमेदवारी (Aprenticeship) कारखान्यातून पूर्ण करावी लागते त्यानंतर वेगवेगळ्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कारखान्यामध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. . तसेच डिप्लोमा इंजीनिअरिंग मध्ये पुढील शिक्षणासाठी थेट द्वितीय वर्षामध्ये प्रवेश मिळतो पदवी अभ्यासक्रम सहज पूर्ण करता येतो.

✓ **संधाता ( वेल्डर ):**

ह्या व्यवसायात प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात प्रचंड मागणी आहे. हा व्यवसाय एक वर्ष कालावधीचा असुन ह्या व्यवसायामध्ये आपल्याला आर्क वेल्डिंग, गस वेल्डिंग, $Co_2$ वेल्डिंग, TIG, MIG, स्पॉट वेल्डिंग, प्लास्मा कटिंग अशा विविध वेल्डिंग प्रक्रिया शिकविल्या जातात. तसेच मेटल्स, मेंटेनन्स अशा विविध प्रक्रियेविषयी प्रशिक्षण मिळते. ह्या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर एक वर्षाची शिकाऊ उमेदवारी (Aprenticeship) कारखान्यातून पूर्ण करावी लागते त्यानंतर वेगवेगळ्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कारखान्यामध्ये नोकरीच्या व स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

✓ **कोपा (कॉम्पुटर ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग असिस्टन्स) :**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात Computer व Technology यांना किती महत्व आहे हे जवळपास आपल्यापैकी सर्वांनाच माहित आहे. येणाऱ्या काही वर्षात सर्वच जागी तंत्रज्ञानच असेल त्यामुळे या ट्रेड ला एक विशिष्ट महत्व आहे . आपण आता बघूया कि या ट्रेड मध्ये आपल्याला काय काय शिकायला मिळणार आहे .

एका वर्षात तुम्हाला संगणकाची संपूर्ण प्राथमिक माहिती , ते कसे कार्य करते इंटरनेट काय आहे याबद्दल सांगितल्या जाते . संगणकाची प्राथमिक दुरुस्ती त्याची भाग त्याच्या सोबत असणाऱ्या बाकी वस्तू जसे कि प्रिंटर, स्कॅनर त्यांचा उपयोगात ते कसे इन्स्टॉल केले जाते हे सुद्धा तुम्हाला शिकविले जाते

पुढे तुम्हाला मायक्रोसॉफ्ट वर्ड, एक्सएल, पॉवर पॉईंट सुद्धा शिकवले जाते . MS-CIT मध्ये जे शिकवले जाते ते व त्याच्या पुढील सर्व ॲडव्हान्स माहिती COPA मध्ये शिकविले जाते. संगणकामध्ये ऑपरेटिंग सिस्टम कशी लोड केल्या जाते ते संगणकाची दुरुस्ती तसेच HTML, JAVA SCRIPT यासारख्या संगणकीय भाषेचे ज्ञान सुद्धा दिले जाते तुम्ही त्याचा उपयोग करून वेबसाईट बनवू शकता . ACCOUNTANCY मध्ये वापरले जाणारे TALLY हे सॉफ्टवेअर सुद्धा पूर्ण शिकवले जाते आणि सर्वात महत्वाचे म्हणजे CYBER SECURITY म्हणजेच वायरस व बाहेरील लोकां पासून आपली संगणक व आपली माहिती कशा प्रकारे सुरक्षित ठेवावी याचे ज्ञान तुम्हाला एका वर्षात या ट्रेड मध्ये मिळते.

तुम्ही हा ट्रेड केल्यावर POLYTECHNIC च्या COMPUTER ENGINEERING या ब्रांच च्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळतो .

शासकीय नोकरीची संधी : - जवळपास केंद्र राज्य शासनाच्या सर्वच विभागात या ट्रेड साठी जागा उपलब्ध होतात . कारण आज असा एकही विभाग नाही ज्यामध्ये संगणकाचे काम नाही. शासकीय बँक, इंडियन ऑइल सारख्या पेट्रोलियम कंपन्या, ISRO, DRDO सारख्या रिसर्च इन्स्टिटयूट मध्ये सुद्धा तुम्हाला नोकरी मिळू शकते खाजगी नोकरी प्रत्येक खाजगी कंपनी मध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर ची गरज असते . तुम्ही

नामांकित कंपनी मध्ये कॉप्युटर ऑपरेटर या पदावर चांगल्या पगारावर काम करू शकता. एयरपोर्ट, कॉम्पुटर सेंटर, वेगवेगळे शोरूम येथे सुद्धा जॉब ची संधी उपलब्ध होते.

## ✓ द्विलक्षी अभ्यासक्रम :

### ❖ मेकेनिकल मेंटेनन्स :

ज्या 10 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इंजीनिअरिंग क्षेत्रामध्ये करिअर करावयाचे आहे, त्यांनी 11 वी मध्ये सायन्स ह्या शाखेतून प्रवेश घेऊन एक भाषा व जीवशास्त्र हे विषय स्किप करून महाराष्ट्र शासनाच्या द्विलक्षी अभ्यासक्रमापैकी मेकॅनिकल मेंटेनन्स हा विषय निवडावा. ह्या विषयामध्ये बेसिक फिटिंग, वेल्डिंग, वूड टेक्नीशिअन, ऑटोमोबाईल अशा विविध विषयांवर प्रशिक्षण दिले जाते. ह्या शाखेतून प्रशिक्षण घेऊन 12 वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इंजिनीअरिंगच्या डिप्लोमा साठी थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळतो तसेच इंजिनीअरिंगच्या पदवी प्रवेशासाठी प्राधान्य मिळते. ह्या कोर्सेस मध्ये पेपर- 1 आणि पेपर -2 असे दोन विषय असून त्यामध्ये प्रत्येक विषयामध्ये प्रात्यक्षिक व थिअरी विषय शिकविले जातात व दोन्ही विषयाची प्रत्येकी १०० मार्कांची परीक्षा घेतली जाते त्यामुळे हे विषय 12 वी मध्ये अधिक स्कोर मिळवून देतात. आपल्या आजू बाजूच्या औद्योगिक क्षेत्राचा विचार करता स्वयंरोजगाराच्या देखील संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. थोडक्यात हा विषय अल्प कालावधीमध्ये रोजगार मिळवून देणारा आहे. अशा प्रकारचे शिक्षण पालघर जिल्ह्यात केवळ आपल्या संस्थेतून दिले जात.

### ❖ इलेक्ट्रीकल मेंटेनन्स :

ज्या 10 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इंजीनिअरिंग क्षेत्रामध्ये करिअर करावयाचे आहे, त्यांनी 11 वी मध्ये सायन्स ह्या शाखेतून प्रवेश घेऊन एक भाषा व जीवशास्त्र हे विषय स्किप करून महाराष्ट्र शासनाच्या द्विलक्षी अभ्यासक्रमापैकी इलेक्ट्रिकल मेंटेनन्स हा विषय निवडावा. ह्या विषयामध्ये बेसिक इलेक्ट्रिसिटी, जनरेशन, ट्रान्समिशन, डीस्ट्रीब्युशन या विषयी तसेच विविध होम अप्लायन्सेस मेंटेनन्स , मोटार, जनरेटर या चे प्रशिक्षण दिले जाते. अशा विविध विषयांवर प्रशिक्षण दिले जाते ह्या शाखेतून प्रशिक्षण घेऊन 12 वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इंजिनीअरिंगच्या डिप्लोमा साठी थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळतो तसेच इंजिनीअरिंगच्या पदवी प्रवेशासाठी प्राधान्य मिळते. ह्या कोर्सेस मध्ये पेपर- 1 आणि पेपर -2 असे दोन विषय असून त्यामध्ये प्रत्येक विषयामध्ये प्रात्यक्षिक व थिअरी विषय शिकविले जातात व दोन्ही विषयाची प्रत्येकी १०० मार्कांची परीक्षा घेतली जाते त्यामुळे हे विषय 12 वी मध्ये अधिक स्कोर मिळवून देतात. आपल्या आजू बाजूच्या औद्योगिक क्षेत्राचा विचार करता स्वयंरोजगाराच्या देखील संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. थोडक्यात हा विषय अल्प कालावधीमध्ये रोजगार मिळवून देणारा आहे.

# प्रवेश रद्द व शुल्क परतावा

1. प्रवेशित उमेदवार आपला प्रवेश औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट देऊन आपला लॉग इन आय डी. वापरून ऑनलाईन पद्धतीने रद्द करू शकतो, त्यासाठी संबंधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था व उमेदवार दोघांना आपला लॉग इन आय डी. वापरून प्रवेश रद्द करावा लागेल.

2. ऑनलाईन प्रवेश प्रणालीच्या माध्यमातूनच प्रवेश रद्द करणे अनिवार्य आहे.

3. एखाद्या उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर प्रवेश रद्द केला तर तो त्यानंतरच्या प्रवेश फेरीसाठी अपात्र ठरेल. तथापि, असे उमेदवार खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संस्था स्तरावरील जागांसाठी प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत पात्र राहतील.

4. प्रवेश रद्द करते वेळी शुल्क परतावा हा खालील प्रमाणे शुक्ल कपात करून दिले जाईल.
   - ✓ प्रवेशित उमेदवाराने त्याचा प्रवेश रद्द करण्यासंबंधी चा अर्ज चौथ्या प्रवेश फेरीच्या प्रवेश निश्चिती करण्याच्या शेवटच्या दिवशी व वेळेपूर्वी कार्यालयात दाखल केला असल्यास व्यवसायाच्या एकूण शुल्कातून १०००/- रुपये वजा करून उर्वरित रक्कम परत केली जाईल.
   - ✓ प्रवेशित उमेदवाराने त्याचा प्रवेश रद्द करण्यासंबंधी चा अर्ज प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर कार्यालायात दाखल केला असल्यास अनामत रकमेशिवाय कोणताही परतावा दिला जाणार नाही.

उमेदवारांचे प्रवेश घेताना त्यांचा शाळा सोडल्याचा मूळ दाखला व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( SSC) परीक्षेचे मूळ गुणपत्रक संस्थेमध्ये जमा करून घेण्यात येईल. जो पर्यंत उमेदवार प्रवेश रद्द करीत नाही अथवा प्रशिक्षण पूर्ण करीत नाही तो पर्यंत मूळ प्रमाणपत्रे प्रशिक्षणार्थ्याला परत केली जाणार नाहीत.

# महाराष्ट्र शासनाची “फी प्रतिपूर्ती योजना”

खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्रीय प्रवेश फेरीतून प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांना विशिष्ट प्रमाणात शासनाकडून फी चा परतावा केला जातो. त्यासाठी महा-डीबीटी पोर्टल वर प्रशिक्षणार्थ्यांनी अर्ज करणे आवश्यक असते. सदरचे अर्ज करण्या संबंधी संस्थेतून प्रशिक्षणार्थ्याला अचूक मार्गदर्शन केले जाते तसेच इच्छुक व पात्र प्रशिक्षाणार्थ्यांचे ऑन-लाईन अर्ज संस्थेतून भरून दिले जातात.

## आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचा शासन निर्णय, दि.२९/०५/२०१९ १५/०३/२०२१ ०९/०९/२०२१ पहावा.

**OPEN CATEGORY - ECONOMICALLY WEAKER SECTION (EWS)**

### प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरीता पात्रता निकष

- उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.
- मोबाईल नंबर आधार कार्डशी संलग्न (जोडलेला) असावा, आधारकार्ड आणि आधारकार्डशी संलग्न असलेला मोबाईल नंबर विद्यार्थ्यांच्या बॅंकेतील खात्याशी संलग्न किंवा जोडलेला असावा
- उमेदवाराने PPP-IMC अंतर्गत शासकीय संस्थेत अथवा खाजगी संस्थेत प्रवेश घेतलेला असावा.
- उमेदवार हा केवळ केंद्रिय प्रवेश पद्धतीने CAP-Round ने प्रवेशित झालेला असावा.
- उमेदवाराने प्रवेश घेतलेला व्यवसाय DGT, New Delhi द्वारा मान्यताप्राप्त असावा.
- उमेदवार हा खुल्या प्रवर्गाचा असून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असावे.
- उमेदवाराकडे मागील वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र असावे.
- उमेदवाराने यापुर्वी शासकीय अथवा खाजगी औ.प्र. संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमाचा असा लाभ घेतलेला नसावा.
- उमेदवाराने राज्य/केंद्र/स्थानिक स्वराज्य संस्था/कंपनी किंवा महामंडळाने पुरस्कृत केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.
- उमेदवाराची उपस्थिती आधार संलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर नोंदविणे आवश्यक राहील.
- एका कुटुंबातील केवळ पहिल्या दोनच (२) अपत्यांपर्यंत हा लाभ मर्यादित असेल.

विशेष सुचना :- संस्था व्यवस्थापन कोट्यातून (Management Quota) प्रवेशित झालेला उमेदवार लाभास पात्र नाही.

### उत्पन्नाचे निकष व लाभ

- उमेदवाराचे कौटुंबिक एकत्रित वार्षिक उत्पन्न २.५ लाख अथवा त्यापेक्षा कमी असल्यास १०० टक्के प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहिल.
- उमेदवाराचे कौटुंबिक एकत्रित वार्षिक उत्पन्न २.५ लाख पेक्षा जास्त व ८ लाख पर्यंत असल्यास ८० टक्के प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहिल.

### आवश्यक दस्तऐवज

- आधार कार्ड
- रेशन कार्ड
- शैक्षणिक प्रमाणपत्रे १०/१२/इतर
- अधिवास प्रमाणपत्र (डोमेसाईल)
- उत्पनाचा दाखला
- E.W.S. Certif ate
- CAP-Round Allotment Leter
- प्रशिक्षण शुल्क भरल्याची पावती

## अनुसूचित जमाती प्रवर्ग

आदिवासी विकास विभाग यांचा शासन निर्णय, दि.२९/०७/२०१९ पहावा.

**SCHEDULED TRIBE CATEGORY (ST)**

### प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरीता पात्रता निकष

- उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.
- मोबाईल नंबर आधार कार्डशी संलग्न (जोडलेला) असावा, आधारकार्ड आणि आधारकार्डशी संलग्न असलेला मोबाईल नंबर विद्यार्थ्यांच्या बॅंकेतील खात्याशी संलग्न किंवा जोडलेला असावा.
- उमेदवाराने PPP-IMC अंतर्गत शासकीय संस्थेत अथवा खाजगी संस्थेत प्रवेश घेतलेला असावा.
- उमेदवार हा केवळ केंद्रिय प्रवेश पद्धतीने CAP-Round ने प्रवेशित झालेला असावा.
- उमेदवाराने प्रवेश घेतलेला व्यवसाय DGT, New Delhi द्वारा मान्यताप्राप्त असावा.
- प्रवेश घेताना उमेदवाराने मूळ शाळा सोडल्याचा दाखला सादर केलेला असावा.
- उमेदवाराकडे अनुसूचित जमातीचे सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र असावे.
- उमेदवाराकडे मागील वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र असावे.
- उमेदवाराने यापुर्वी शासकीय अथवा खाजगी औ.प्र. संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमाचा असा लाभ घेतलेला नसावा.
- उमेदवाराने राज्य/केंद्र/स्थानिक स्वराज्य संस्था/कंपनी किंवा महामंडळाने पुरस्कृत केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.
- उमेदवाराची उपस्थिती आधार संलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर नोंदविणे आवश्यक राहील.
- एका कुटुंबातील केवळ पहिल्या दोनच (२) अपत्यांपर्यंत हा लाभ मर्यादित असेल.

विशेष सुचना :- संस्था व्यवस्थापन कोट्यातून (Management Quota) प्रवेशित झालेला उमेदवार लाभास पात्र नाही.

### उत्पन्नाचे निकष व लाभ

- इयत्ता १०वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी असणारया व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी रू.८.०० लाखापर्यंत उत्पन्न असणारया व इयत्ता १०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अभ्यासक्रमासाठी रू.२.५१ लाख ते ८.०० लाख या उत्पन्नाच्या मर्यादेत उत्पन्न असणारया ST विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील. परंतु इयत्ता १०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अभ्यासक्रमासाठी रू.२.५० लाखापर्यंत उत्पन्न असणारया विद्यार्थ्यांना क्रेंद्रशासनाच्या पोस्टमॅट्रीक योजनेचे लाभ अनुज्ञेय असल्यामुळे त्यांना या योजनेचे लाभ अनुज्ञेय होणार नाहीत विहीत केलेल्या प्रशिक्षण शुल्काच्या रकमेची १००% प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

### आवश्यक दस्तऐवज

- आधार कार्ड
- रेशन कार्ड
- शैक्षणिक प्रमाणपत्रे १०/१२/इतर
- अधिवास प्रमाणपत्र (डोमेसाईल)
- उत्पनाचा दाखला
- जात व जात वैधता प्रमाणपत्र
- CAP-Round Allotment Leter
- प्रशिक्षण शुल्क भरल्याची पावती

## अनुसूचित जाती प्रवर्ग

सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभाग यांचा शासन निर्णय, दि.०१/०८/२०१९ पहावा.

**SCHEDULED CASTE CATEGORY (SC)**

### प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरीता पात्रता निकष

- उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.
- मोबाईल नंबर आधार कार्डशी संलग्न (जोडलेला) असावा, आधारकार्ड आणि आधारकार्डशी संलग्न असलेला मोबाईल नंबर विद्यार्थ्यांच्या बॅंकेतील खात्याशी संलग्न किंवा जोडलेला असावा.
- उमेदवाराने PPP-IMC अंतर्गत शासकीय संस्थेत अथवा खाजगी संस्थेत प्रवेश घेतलेला असावा.
- उमेदवार हा केवळ केंद्रिय प्रवेश पद्धतीने CAP-Round ने प्रवेशित झालेला असावा.
- उमेदवाराने प्रवेश घेतलेला व्यवसाय DGT, New Delhi द्वारा मान्यताप्राप्त असावा.
- उमेदवाराकडे अनुसूचित जातीचे सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र असावे.
- उमेदवाराकडे मागील वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र असावे.
- उमेदवाराने यापुर्वी शासकीय अथवा खाजगी औ.प्र. संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमाचा असा लाभ घेतलेला नसावा.
- उमेदवाराने राज्य/केंद्र/स्थानिक स्वराज्य संस्था/कंपनी किंवा महामंडळाने पुरस्कृत केलेल्या
- प्रशिक्षण कार्यक्रमाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.
- उमेदवाराची उपस्थिती आधार संलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर नोंदविणे आवश्यक राहील.
- एका कुटुंबातील केवळ पहिल्या दोनच (२) अपत्यांपर्यंत हा लाभ मर्यादित असेल.

विशेष सुचना :- संस्था व्यवस्थापन कोट्यातून (Management Quota) प्रवेशित झालेला उमेदवार लाभास पात्र नाही.

### उत्पन्नाचे निकष व लाभ

- प्रस्तुत योजनेच्या लाभाकरीता ज्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे कुटुंबाचे मागील वर्षातील एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये ८.०० लाखाच्या मर्यादेत आहे असे विद्यार्थी योजने अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्तीच्या लाभास पात्र राहतील. यामध्ये ज्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे कुटुंबाचे मागील वर्षातील एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये २.५० लाखाच्या मर्यादेत आहे त्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देय होईल. तसेच केंद्रशासनाने सदर उत्पन्न मर्यादेत भविष्यात बदल केल्यास त्याप्रमाणे उत्पन्नाच्या निकषातील बदल योजनेअंतर्गत लागू राहतील.
विहीत केलेल्या प्रशिक्षण शुल्काच्या रकमेची १००% प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

### आवश्यक दस्तऐवज

- आधार कार्ड
- रेशन कार्ड
- शैक्षणिक प्रमाणपत्रे १०/१२/इतर
- अधिवास प्रमाणपत्र (डोमेसाईल)
- उत्पनाचा दाखला
- जातीचे प्रमाणपत्र
- CAP-Round Allotment Leter
- प्रशिक्षण शुल्क भरल्याची पावती

## इतर मागास प्रवर्ग

इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचा शासन निर्णय, दि.०२/०८/२०१९ पहावा.

**OTHER BACKWARD CLASS (OBC, VJNT, SBC)**

### प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरीता पात्रता निकष

- उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.
- मोबाईल नंबर आधार कार्डशी संलग्न (जोडलेला) असावा, आधारकार्ड आणि आधारकार्डशी संलग्न असलेला मोबाईल नंबर विद्यार्थ्यांच्या बॅंकेतील खात्याशी संलग्न किंवा जोडलेला असावा.
- उमेदवाराने PPP-IMC अंतर्गत शासकीय संस्थेत अथवा खाजगी संस्थेत प्रवेश घेतलेला असावा.
- उमेदवार हा केवळ केंद्रिय प्रवेश पद्धतीने CAP-Round ने प्रवेशित झालेला असावा.
- उमेदवाराने प्रवेश घेतलेला व्यवसाय DGT, New Delhi द्वारा मान्यताप्राप्त असावा.
- उमेदवाराकडे त्याच्या जाती प्रवर्गाचे (OBC, VJNT, SBC) सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र व उन्नत गटात (नॉन क्रिमिलिअर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असावे.
- उमेदवाराकडे मागील वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र असावे.
- उमेदवाराने यापुर्वी शासकीय अथवा खाजगी औ.प्र. संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमाचा असा लाभ घेतलेला नसावा.
- उमेदवाराने राज्य/केंद्र/स्थानिक स्वराज्य संस्था/कंपनी किंवा महामंडळाने पुरस्कृत केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.
- उमेदवाराची उपस्थिती आधार संलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर नोंदविणे आवश्यक राहील.
- एका कुटुंबातील केवळ पहिल्या दोनच (२) अपत्यांपर्यंत हा लाभ मर्यादित असेल.

विशेष सुचना :- संस्था व्यवस्थापन कोट्यातून (Management Quota) प्रवेशित झालेला उमेदवार लाभास पात्र नाही.

### उत्पन्नाचे निकष व लाभ

- पीपीपी योजनेअंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागासाठी व खाजगी ओद्यौगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांसाठी केंद्रभूत प्रवेश पध्दतीने घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या ८०% इतक्या रकमेची प्रतिपूर्ती विजाभज इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

### आवश्यक दस्तऐवज

- आधार कार्ड
- रेशन कार्ड
- शैक्षणिक प्रमाणपत्रे १०/१२/इतर
- अधिवास प्रमाणपत्र (डोमेसाईल)
- उत्पनाचा दाखला
- जात व Non-Creamy Layer प्रमाणपत्र
- CAP-Round Allotment Leter
- प्रशिक्षण शुल्क भरल्याची पावती

| अ.क्र. | उमेदवारांचे प्रकार | सादर करावयाचे कागदपत्रे |
|---|---|---|
| | व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे (नियम क्र. १७ अन्वये) | |
| | सर्व उमेदवारांकरिता | १. आधार नोंदणी कार्ड<br>२. प्रशिक्षणार्थ्यांचे नाव समाविष्ट असलेले रेशनकार्ड<br>३. महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)<br>४. पालकांचा उत्पन्नाचा दाखला<br>५. जातीचा दाखला<br>६. जात वैधता प्रमाणपत्र - फक्त अनुसुचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांकरीता लागू<br>७. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र - फक्त खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थ्यांकरीता लागू<br>८. दिव्यांग प्रवर्गातिल प्रशिक्षणार्थ्यांकरीता वैद्यकीय मंडळाकडून दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र ज्यात अपंगत्व कायमस्वरुपी असून त्याचे प्रमाण ४०% पेक्षा जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख आहे.<br>९. पुढील वर्षातील ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र - विमुक्त जाती आणि भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी |

* भारतीय राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र देण्यासाठी खालील कागदपत्रे मान्य केली जातील:

१. उमेदवाराचे राष्ट्रीयत्व " भारतीय" म्हणून दर्शविलेले शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
२. योग्य प्राधिकाऱ्याने उमेदवाराच्या नावाने दिलेले भारतीय पारपत्र
३. उमेदवाराचे जन्म ठिकाण भारतात आहे असे दर्शविलेले जन्म प्रमाणपत्र

** अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate):

महाराष्ट्र राज्यातील योग्य प्राधिकाऱ्याकडून दिलेले अधिवास प्रमाणपत्र वैध म्हणून विचारात घेतले जाईल. उमेदवाराच्या आईचे अधिवास प्रमाणपत्राच्या पुष्ठ्यर्थ विवाह प्रमाणपत्र अथवा नावात बदल झालेला कायदेशीर पुरावा जोडण्यात यावा. अशा उमेदवाराकडून आईच्या नावाचा स्पष्ट उल्लेख असलेले जन्म प्रमाणपत्र जोडावे लागेल.

पात्रतेसाठीचा अंतिम दिनांक:

केंद्रीय प्रवेश पध्दतीमधील ऑनलाईन अर्ज भरण्याचा आणि प्रवेश निश्चितीचा अंतिम दिनांक विचारात घेऊन सर्व नियम आणि अटी लागू होण्याच्या सर्व उद्देशांसह, उमेदवाराची पात्रता निश्चित केली जाईल अथवा ठरविली जाईल. विस्तृतपणे असे स्पष्ट केले जाते की, केंद्रीय प्रवेश पध्दतीमधील ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी या अटी आणि शर्तीनुसार जर उमेदवार अपात्र आढळला आणि अशा अपात्र उमेदवाराने वर उल्लेखिलेल्या अंतिम दिनांकानंतर (म्हणजे ऑनलाईन अर्ज भरण्याची आणि प्रवेश अर्ज निश्चितीचा अंतिम दिनांक) मागणी केलेली पात्रता मिळवल्यास, अशा अंतिम दिनांकानंतर मिळविलेली पात्रता, अपात्र उमेदवाराला कोणत्याही उद्देशासाठी अथवा प्रवेशातील कोणत्याही बाबींसाठी पात्र ठरवू शकत नाही.

या बाबतची अधिकची माहिती संस्थेमधून स्वतंत्र पणे उमेदवारांना देण्यांत येईल. तरी जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थ्यांनी शासनाच्या सदर योजनेचा लाभ घ्यावा.

**अधिक माहितीसाठी खालील संकेतस्थळावर भेट दयावी**

**https://mahadbtmahait.gov.in/**

**"खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक" या प्रवर्गांतर्गत आरक्षणाच्या पुष्ठ्यर्थ सामान्य प्रशासन विभाग यांचे दि.१२.०२.२०१९ च्या शासन निर्णयासह आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी देण्यात आलेले प्रमाणपत्राचा मराठी नमुना**

शासन निर्णय क्रमांकः **राआधो- ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२/०२/२०१९ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट- अ

## महाराष्ट्र शासन

प्रमाणपत्र क्र.

**फोटो**

## आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी विहित केलेल्या १०% आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ----------------------- श्री/श्रीमती------------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी गाव/शहर------------तालुका ------------ जिल्हा/विभाग -------------- महाराष्ट्र चे रहिवासी आहेत. तो/ती ------------ जातीचे असून जात /पोटजात/ वर्ग चे असून त्याचा समावेश महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधीसूचित जमाती (वि.जा.), भटक्या जमाती (भ.ज.), विशेष मागास प्रवर्ग (वि.मा.प्र) आणि इतर मागास प्रवर्ग (इ.मा.व) यांच्या साठी आरक्षण अधिनियम -२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम ८) आणि महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम,२०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गातर्गत होत नाही.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये त्याच्या/तिच्या कुटूंबाचे सर्व स्त्रोतांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ------------------/- असून, सदर उत्पन्न रु.८,००,०००/- पेक्षा कमी आहे. त्यामुळे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, तो/ ती यांचा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकामध्ये समावेश होतो.

ठिकाण :

दिनांक:

स्वाक्षरी :

नाव :

पदनाम :

हे प्रमाणपत्र अर्जकर्त्याने सादर केलेल्या खालील कागदपत्र/पुरावे यांच्या आधारावर निर्गमित करण्यात येत आहे.

१.
२.
३.

Industrial Training Institute

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

# इयत्ता 10 वी 12 वी समकक्षता प्रमाणपत्र

आयटीआय परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक अर्हता दहावी व बारावीच्या समकक्ष आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यानुसार दहावीची परीक्षा न दिलेल्या अथवा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केल्यास त्याला दहावी उत्तीर्ण झाल्याचे गृहित धरून त्यानुसार क्रेडिट देण्यात येतील. बारावीबाबतही हीच पद्धत अवलंबली जाईल. केवळ त्यासाठी भाषा विषयाच्या परीक्षा द्याव्या लागणार आहेत.

आठवीनंतर आयटीआयच्या विविध शाखांमध्ये प्रवेश मिळतो. विविध कौशल्य प्राप्त करणाऱ्या या विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता दहावी अथवा बारावी उत्तीर्ण म्हणून गृहीत धरली जात नाही. त्यामुळे अनेकदा आयटीआय उत्तीर्ण होऊनही दहावी अथवा बारावीनंतरच्या पुढील शिक्षणासाठी त्याचा लाभ मिळत नाही. हीच अडचण दूर करण्यासाठी राज्य सरकारने यासंदर्भात नुकताच शासन निर्णय जाहीर केला. यानुसार दहावी अनुत्तीर्ण झालेल्या मात्र आयटीआय पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना यापुढे दहावीच्या समकक्ष आणण्यात येईल. त्याप्रमाणे त्यांना क्रेडिट देण्यात येतील. आयटीआयच्या गुणपत्रिकेतील दहावी अनुत्तीर्ण शेरा बदलून 'कौशल्य विकासासाठी पात्र' असे नमूद करण्यात येईल. त्याप्रमाणेच दहावीनंतर आयटीआयचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही बारावी उत्तीर्णचा दर्जा बहाल होईल व त्यांना दहावीप्रमाणेच क्रेडिट देण्यात येतील.

भाषा विषय उत्तीर्ण करणे अनिवार्य

राज्य सरकारने दहावी आणि बारावीच्या समकक्ष करण्याचा निर्णय जाहीर केला असला तरी शिक्षण मंडळाच्या नियमाप्रमाणे या दोन्ही परीक्षांसाठी दोन भाषा उत्तीर्ण करणे अनिवार्य आहे. तसेच पर्यावरणशास्त्र व ग्रेड विषयांतही उत्तीर्ण होणे आवश्यक असेल, असेही यावेळी जाहीर करण्यात आले आहे.

शासनाच्या ह्या योजनेचा लाभ घेऊन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळानी मार्च 2023 मध्ये घेतलेल्या 12 वी च्या परीक्षेस एकूण 25 प्रशिक्षणार्थी प्रविष्ठ झाले होते ते सर्व प्रशिक्षणार्थी उत्तम मार्कांनी उत्तीर्ण झाले त्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाकडून 12 वी चे प्रमाणपत्र प्रदान करण्यांत आले.

# प्रशिक्षण कालावधीतील प्रशिक्षणार्थ्यांचे संस्थेतील आचरण, शिस्त व नियम

- जर उमेदवार प्रवेश अर्जामध्ये परिपूर्ण व अचूक विधान करण्यांस अपयशी ठरत असेल / काही माहिती दडवत असेल / खोटे कागद पत्र सादर करीत असेल तर तो प्रवेशास अपात्र ठरेल. अशा उमेदवारांवर संपूर्ण प्रवेश प्रक्रियेकरिता बंदी घालण्यांत येईल , त्यामुळे उमेदवाराने असाच दावा करावा कि, तो सिद्ध करण्याच्या पृष्ट्यर्थ संबंधित मूळ दस्तऐवज आहेत.
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेत असताना शासनाने / संस्थेने लागू केलेल्या कायदा व नियमाच्या विरुद्ध किंवा राष्ट्रविरोधी किंवा संस्थेच्या शिस्त-नियमांच्या विरुद्ध कृत्य करताना आढळल्यास त्यास कोणत्याही सूचनेशिवाय प्राचार्यांमार्फत निलंबित करण्यांत येईल वा जवळच्या पोलीस ठाण्यांत कळविण्यात येईल.
- प्रशिक्षणार्थ्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेताना संस्थेने आखून दिलेल्या सर्व शिस्त व नियमांचे काटेकोर पणे पालन करावे. प्रशिक्षणार्थ्याने संस्थेने/ शासनाने विहित केलेल्या आचार व शिस्तींच्या नियमांचे उल्लंघन केल्यास, त्यास स्पष्टीकरणाची संधी उपलब्ध करून दिल्यानंतर संस्थेच्या प्राचार्यांना त्या प्रशिक्षणार्थ्यांस निलंबित करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.
- प्रशिक्षण कालावधीमध्ये संस्थेने / शासनाने प्रशिक्षणा संबंधी कोणताही धोरणात्मक निर्णय घेतला असल्यास अथवा धोरणात बदल केला असल्यास त्याचे पालन करणे प्रशिक्षणार्थ्यास बंधनकारक राहील.
- ज्या समस्या वर उल्लेखल्या गेल्या नाहीत , अशा समस्या उद्भवल्यास त्याबाबत पूर्ण व अंतिम कार्यवाही संस्थेच्या प्राचार्या मार्फत केली जाईल.
- अर्जामध्ये नमूद केलेली माहिती किंवा प्रवेशाच्या वेळी किंवा प्रवेशोत्तर कार्यवाही करताना उमेदवाराने प्रवेशा संबंधी दिलेली माहिती प्रशिक्षणाच्या कोणत्याही स्तरावर खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवाराचा प्रवेश रद्द केला जाईल, शुल्क जमा केले जाईल.
- प्रशिक्षणार्थ्यास त्याच्या अखिल भारतीय व्यवसाय परीक्षेस पात्र होण्यासाठी प्रत्येक सत्रामध्ये किमान 80% उपस्थिती कायम ठेवणे बंधनकारक आहे. जर प्रशिक्षणार्थी अशी किमान उपस्थिती कायम ठेवण्यास अपयशी झाल्यास त्यास अखिल भारतीय व्यवसाय परीक्षेस पात्र होता येणार नाही.
- आपली हि संस्था पूर्ण खाजगी तत्वावर कार्यरत असून संस्थेतील सर्व खर्च हे केवळ प्रशिक्षणार्थ्यांच्या फी च्या माध्यमातून भागविले जातात. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांनी त्यांची पूर्ण फी ही प्रवेश निश्चित करताना संस्थेच्या कार्यालयात जमा करावी. तसेच ज्या प्रशिक्षणार्थ्यांना विशेष बाब म्हणून फी भरण्यास वेळेची सवलत दिली आहे त्यांनी विहित कालावधीत पूर्ण फी भरणे अपेक्षित आहे, तसेच त्या कालावधीतील शिल्लक फी च्या रकमेचे धनादेश संस्थेच्या कार्यालयात जमा करावे. जर प्रशिक्षणार्थी विहित कालावधीत त्यांची फी भरण्यास असमर्थ ठरले तर संस्थेने ठरवून दिलेल्या कालावधी नंतर प्रति महिना 200/- रुपये एवढा विलंब आकार प्रति महिना उर्वीरत संपूर्ण फी भरे पर्यंत भरावी लागेल. जो पर्यंत प्रशिक्षणार्थ्याची पूर्ण फी भरली जाणार नाही तो पर्यंत त्यास बस/रेल्वे सवलत पास, ओळख पत्र अशा सवलती दिल्या जाणार नाहीत.

- प्रशिक्षण कालावधीत संस्थेतील सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होणार नाही ह्याचे प्रत्येक प्रशिक्षाणार्थ्यांनी भान राखावे. एखादा प्रशिक्षणार्थी कोणत्याही प्रकारे संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्वरित त्या संबंधीची माहिती कर्मचारी वर्गास देण्यांत यावी. अन्यथा वर्ष अखेरीस संस्थेतील मालमत्तेची झालेली नुकसान भरपाई सर्व प्रशिक्षणार्थ्यांच्या अनामत रकमेतून वजा करून घेण्यात येईल.
- संस्थेतील प्रशिक्षण सकाळी ७.३० ते दुपारी ३.३० आणी सकाळी ९ ते संध्या.५ अश्या दोन सत्रात चालते. वेळापत्रकानुसार प्रशिक्षणार्थ्यांनी त्यांच्या नियोजित वेळेत संस्थेत प्रात्यक्षिक व लेक्चर्स ला उपस्थित राहावे. नियोजित वेळेपेक्षा काही कारणास्तव संस्थेत येण्यास १० मिनिटे उशिरापर्यंत संस्थेत प्रवेश दिला जाईल, त्या नंतर मात्र सदर प्रशिक्षणार्थ्याची गैर-हजेरी धरण्यांत येईल. काही अपरीहार्य कारणानिमित्त संस्थेत येण्यास उशीर होणार असेल तर तशी आगाऊ कल्पना प्रशिक्षणार्थी/पालक ह्यांनी संबंधित शिल्प-निदेशकांना देणे गरजेचे आहे.
- संस्थेमध्ये प्रवेशित होताना दररोज युनिफॉर्म, एप्रोन, ओळखपत्र, सेफ्टी शूज परिधान करणे बंधनकारक आहे. स्वत:च्या व इतरांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत विशेष काळजी प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे व त्या बाबतीत वेळोवेळी समज देऊनही जर प्रशिक्षणार्थी सकारात्मक प्रतिसाद देत नसेल तर त्यावर कार्यालयातून उचित कारवाई केली जाईल.
- संस्थेमध्ये प्रवेशित झाल्या दिनांका पासून १५ दिवसांच्या आत प्रशिक्षणाच्या दृष्टीकोनांतून वैद्यकीय दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र (Fitness Certificate) शासकीय रुग्णालयातून आणावे.
- प्रशिक्षण घेत असताना शिल्प-निदेशक, निदेशक ह्यांनी नेमून दिलेल्या वह्या, पुस्तके संबंधित विषयाच्या लेक्चर्स ला घेऊन येणे बंधनकारक आहे तसेच दिलेल्या कालमर्यादेत संबंधित वह्या संबंधित शिल्प-निदेशक, निदेशक ह्यांच्या कडून तपासून घ्याव्या.
- प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांनी दररोज केलेल्या कामाचा तपशील वैयक्तिक दैनंदिनी मध्ये लिहून ती दररोज शिल्प-निदेशकाकडून तपासून घ्यावा. तसेच वेळोवेळी पालकांनी तपासून आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगती विषयी माहिती करून घ्यावी व शंका असल्यास संस्थेशी संपर्क साधावा.
- प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांकडून संस्थेतील निदेशक व कर्मचारी वर्ग ह्यांच्याशी अरेरावी च्या भाषेत संभाषण करणे, धमक्या देणे अश्या प्रकारचे वर्तन झाल्यास त्यास संस्थेतून कडक कारवाई करण्यांत येईल.
- सार्वजनिक क्षेत्रात वावरताना व आपण संस्थेचा युनिफॉर्म, ओळखपत्र परिधान केलेले असताना आपली ओळख ह्या संस्थेचा प्रशिक्षणार्थी म्हणून होत असते, म्हणून अशावेळी असभ्य वर्तनाने आपल्या संस्थेच्या नावास काळिमा लागू नये ह्याची विशेष काळजी आपण घ्यावी.
- संस्थेमध्ये प्रशिक्षण कालावधीमध्ये मोबाईल वापरण्यास मनाई आहे, जर प्रशिक्षणार्थी कोणत्याही महत्वाच्या कामाशिवाय व संबंधित निदेशक, शिल्प-निदेशक ह्यांच्या परवानगीशिवाय संस्थेमध्ये मोबाईलचा वापर करताना आढळल्यास त्याचा मोबाईल कार्यालयात जमा करून घेण्यांत येईल व योग्य कारवाई नंतर त्यास

तो परत करण्यांत येईल. सदरच्या कालावधीत मोबाईल गहाळ झाल्यास अथवा तुट फुट झाल्यास त्याची जबाबदारी हि सर्वस्वी प्रशिक्षणार्थ्यांची राहील.

- प्रशिक्षण कालावधीमध्ये एखाद्या प्रशिक्षणार्थ्यास मोठ्या सुट्टीवर जायचे असल्यास संबंधित शिल्प-निदेशकाला पूर्व सूचना देणे आवश्यक आहे व त्यामध्ये हि त्याची किमान उपस्थिती ८०% पेक्षा जास्त राहणे बंधनकारक राहील. जर अश्या प्रकारची कोणतीही पूर्व कल्पना न देता प्रशिक्षणार्थी सतत १० दिवसांपेक्षा जास्त दिवस गैर हजर राहिल्यास त्याचे नांव पटावरून कमी करण्याची प्रक्रिया सुरु करण्यांत येईल.
- कोणत्याही अतिरिक्त कामासाठी संबंधित शिल्प-निदेशक, निदेशक ह्यांच्या पूर्व परवानगी शिवाय संस्थेच्या आवारातून बाहेर जाऊ नये. जर कोणतीही पूर्व परवानगी न घेता प्रशिक्षणार्थी संस्थेच्या आवारातून बाहेर गेल्यास व काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशिक्षणार्थी व पालक ह्यांची राहील.
- संस्थेतून प्रशिक्षणाचा भाग म्हणून Industrial Visit परिसरातील कारखान्यात आयोजित केली जाते ह्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची सहल संस्थेतून आयोजित केली जात नाही.
- संस्थेमध्ये प्रशिक्षणासाठी येताना शक्यतो सार्वजनिक वाहतूक सेवेचा अवलंब करावा. रेल्वे ,बस किंवा खाजगी वाहतूक सेवेने येताना इतर नागरिकांना त्रास होईल असे प्रशिक्षणार्थ्यांचे वर्तन असू नये. तसेच दुचाकी घेऊन आल्यास प्रत्यकाने halmet घालणे बंधनकारक आहे.
- रॅगिंग प्रतिबंधात्मक कारवाई : संस्थेमध्ये कोणाही एका प्रशिक्षणार्थ्या मार्फत दुसऱ्या प्रशिक्षणार्थ्याला किंवा कोणाही एका प्रशिक्षणार्थ्यांच्या ग्रुप कडून दुसऱ्या ग्रुपची किंवा एखाद्या प्रशिक्षणार्थ्याचे मानसिक, शारीरिक किंवा आर्थिक खच्चीकरण केले जात असेल व त्या संबंधित प्रशिक्षणार्थ्याने कार्यालयात तक्रार केली तर संबंधित प्रशिक्षणार्थी/ प्रशिक्षणार्थ्यांच्या ग्रुप वर महाराष्ट्र रेगिंग प्रतिबंधात्मक कायदा १९९९ नुसार कारवाई केली जाईल.
- ह्या संस्थेतून प्रशिक्षण घेणारा प्रशिक्षणार्थी हा केवळ तांत्रिक दृष्ट्या कुशल असण्याबरोबरच तो जीवनोपयोगी मुलभूत गुणांनी संस्कारित असावा व अशा युवा शक्तीची गरज देशाला आहे ह्या या विचारातून हि संस्था मार्गक्रमण करीत आहे त्यामध्ये आपण हातभार लावावा व आपणा स्व:ताच्या विकासा बरोबरच ह्या संस्थेचा व संपूर्ण देशाचा विकास घडवून आणावा असा संस्थेचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

Industrial Training Institute

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

# प्रशिक्षाणार्थ्यांचे वैयक्तिक माहिती पत्रक

1. प्रशिक्षणार्थ्यांचे नाव : ____________________

2. प्रवेश घेतलेले वर्ष : ____________________

3. प्रवेश घेतलेला व्यवसाय : ____________________

4. प्रशिक्षणार्थ्याचा आधार कार्ड क्रमांक : ____________________

5. प्रवेशाचे स्वरूप ☐ केंद्रीय प्रवेश फेरी क्रमांक ____ मधून

   ☐ मॅनेजमेंट कोट्या मधून (असल्यास ज्यांच्या मार्फत प्रवेश दिला गेला त्यांचे नाव)

   ____________________

6. प्रशिक्षणार्थ्याचा प्रशिक्षण कालावधीतील रहिवाशी पत्ता : ____________________

   ____________________

   ____________________

7. प्रशिक्षणार्थ्याचा प्रशिक्षण कालावधीतील रहिवाशी पत्ता : ____________________

   ____________________

   ____________________

8. प्रशिक्षणार्थ्याच्या पालकांचे पूर्ण नाव : ____________________

9. प्रशिक्षणार्थ्याच्या पालकाचा व्यवसाय ____________________

10. प्रशिक्षाणार्थ्याचा मोबाईल क्रमांक ____________________

11. पालकांचा मोबाईल क्रमांक : ____________________

12. प्रशिक्षणार्थ्यांस काही शारीरिक अपंगत्व अथवा व्याधी आहे का ? होय / नाही

(असल्यास ____________________)

13. प्रशिक्षणार्थ्यास असलेली जन्म खूण :

____________________

प्रशिक्षणार्थ्याची स्वाक्षरी

पालकाची स्वाक्षरी

Industrial Training Institute

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

## हमीपत्र

प्रशिक्षणार्थी

मी कु. ______________________________________________ पत्ता.___________________

आपल्या शिक्षण संस्थेमध्ये ऑगस्ट २०२३ च्या प्रवेश सत्रामध्ये __________ या व्यवसायामध्ये केंद्रीय प्रवेश फेरी क्रमांक _____/ मॅनेजमेंट कोट्या मधून प्रवेश घेतला आहे.

प्रशिक्षण कालावधीतील संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांचे आचरण, शिस्त व नियम मी नीट वाचले असून ते मला मान्य आहेत तसेच त्यांचे मी काटेकोर पणे पालन करीन. जर माझ्याकडून प्रशिक्षण कालावधीत अपेक्षित आचरण, शिस्त व नियम ह्यांचे उल्लंघन झाल्यास संस्था जी कारवाई माझ्यावर करेल ती मला मान्य असेल व त्यामुळे माझ्या झालेल्या वैयक्तिक नुकसानीस मी स्वत: जबाबदार राहीन असे मी ह्या हमी-पत्राद्वारे जाहीर करीत आहे.

प्रशिक्षणार्थ्यांचे नांव व स्वाक्षरी

---

## हमीपत्र

पालक

माझा पाल्य कु. ________________________________________पत्ता.___________________

आपल्या शिक्षण संस्थेमध्ये ऑगस्ट २०२३ च्या प्रवेश सत्रामध्ये __________ या व्यवसायामध्ये केंद्रीय प्रवेश फेरी क्रमांक _____/ मॅनेजमेंट कोट्या मधून प्रवेश घेतला आहे.

पालक ह्या नात्याने मी श्री./श्रीम.________________________________________या द्वारे अशी हमी देतो कि, प्रशिक्षण कालावधीतील माझ्या पाल्याचे संस्थेतील आचरण, शिस्त संबंधीचे नियम आम्ही नीट वाचले असून ते आम्हाला मान्य आहेत आमचा पाल्य त्यांचे काटेकोर पणे पालन करीन. जर आमच्या पाल्या कडून प्रशिक्षण कालावधीत अपेक्षित आचरण, शिस्त व नियम ह्यांचे उल्लंघन झाल्यास त्यावर संस्था जी कारवाई करेल ती आम्हांस मान्य असेल व त्यामुळे पाल्याच्या झालेल्या वैयक्तिक नुकसानीस तो स्वत: व आम्ही पालक ह्या नात्याने स्वत: जबाबदार असू असे आम्ही ह्या हमी-पत्राद्वारे जाहीर करीत आहे.

पालकाचे नांव व स्वाक्षरी

# शिफारस पत्र

मी श्री.______________________________पत्ता: ______________ह्या द्वारे अशी शिफारस करतो कि, कु. ________________________________________ पत्ता : ______________________ ह्याने आपल्या शिक्षण संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२३ साठी ___________ ह्या व्यवसायात केंद्रीय प्रवेश फेरी क्रमांक ____/ मॅनेजमेंट कोट्या मधून प्रवेशित आहे.

सदर प्रशिक्षणार्थ्याला मी वैयक्तिक रित्या मागील _____ वर्षापासून ओळखत असून, गावातील व सार्वजनिक ठिकाणी त्याची वर्तणूक व आचरण चांगले आहे. आपल्या ह्या शिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण कालावधीतील त्याचे वर्तन देखील चांगले राहील व त्याला मिळालेल्या ह्या संधीचा तो चांगला उपयोग करून भविष्य उजवल करील या बाबत मी शिफारस करतो.

संस्थेचे प्रशिक्षण कालावधीतील प्रशिक्षणार्थ्यांचे आचरण, शिस्त या संबंधीचे नियम मी स्वत: तसेच प्रशिक्षाणार्थ्यांचे पालक व स्वत: प्रशिक्षणार्थी ह्याने स्वत: वाचले असून ते आम्हा सर्वांस मान्य आहेत. जर आमच्या त्याच्या कडून प्रशिक्षण कालावधीत अपेक्षित आचरण, शिस्त व नियम ह्यांचे उल्लंघन झाल्यास त्यावर संस्था जी कारवाई करेल ती आम्हांस मान्य असेल व त्यामुळे त्याच्या झालेल्या वैयक्तिक नुकसानीस तो स्वत: व पालक जबाबदार राहतील.

शिफारस कर्त्याचे नांव आणि स्वाक्षरी.

Industrial Training Institute

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

| शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे** | **पद** |
| १. | श्री. शरद गोविंद राऊत | प्राचार्य |
| २. | श्री. निलेश प्रदीप बाबरेकर | गट-निदेशक |
| ३. | श्री. महेंद्र मनमोहन मर्दे | कार्य. गणित व विज्ञान निदेशक |
| ४. | श्री. किरण गोपाळ चिंचणकर | विजतंत्री/तारतंत्री शिल्प-निदेशक |
| ५. | श्री. सोमनाथ विजय मावळे | विजतंत्री/तारतंत्री शिल्प-निदेशक |
| ६. | श्री. ब्रिजेश दयाराम केणी. | विजतंत्री/तारतंत्री शिल्प-निदेशक |
| ७. | कु. तेजस्विता सुर्यकांत तांडेल | तारतंत्री/विजतंत्री शिल्प-निदेशक |
| ८. | श्री. वैभव कालिदास मर्दे | तारतंत्री/विजतंत्री शिल्प-निदेशक |
| ९. | श्री. प्रणय किरण चिंचणकर | जोडारी शिल्प-निदेशक |
| १०. | श्री. वेदांत राजेश माने | अभि. चित्रकला निदेशक |
| ११. | श्री.जितेंद्र गोविंद पाटील | संधाता शिल्प-निदेशक |
| १२. | सौ. श्रुतिका हेमंत कोरे | कोपा शिल्प-निदेशक |
| १४. | सौ. साक्षी संदीप पाठक | लिपिक |
| १५. | श्री. किरण कमलाकर तामोरे | भांडार-लिपिक |
| १६. | श्री. दिनेश शांताराम भोईर | शिपाई |
| १७. | श्रीमती. करुणा द्वारकानाथ मर्दे | शिपाई |
| | | |

Industrial Training Institute

Skill India
कौशल भारत - कुशल भारत









